c.f. Exampted

Exh.01

**मा.दिवाणी न्यायाधिश साहेब, वरिष्ठ स्तर ता.गंगाखेड**

दिवाणी दावा नंबर 07 /2026

वादीः– 1) रूक्मीनबाई भ्र. विठ्ठल मिरगेवाड
वय 36 वर्षे, धंदा घरकाम
रा.घटांग्रा हा.मु. तांदुळवाडी ता.पालम जि.परभणी.
मो.नं. 7558781939

विरूध्द

प्रतिवादीः – 1) मा.दुयम निबंधक साहेब, दुयम निबंधक कार्यालय, गंगाखेड

2) विठ्ठल पिता रूस्तुम मिरगेवाड
वय 45 वर्षे,धंदा शेती व गुत्तेदारी
रा.घटांग्रा ता.गंगाखेड जि.परभणी.

3) रूस्तुम पिता नारायण मिरगेवाड
वय 62 वर्षे, धंदा शेती
रा.वाल्मीक नगर घटांग्रा ता.गंगाखेड जि.परभणी.

रूक्मीन मिरगेवाड

वाद :– 1) वादीस प्रतिवादी कडून मासीक पोडगी रूपये प्रतिमहा 50,000/– रू. प्रतिवादीकडून देवविण्यात यावे.

अ) वादात्मक शेती गट नंबर 41 नामे रूस्तुम नारायण मिरगेवाड क्षेत्रफळ 36 पोटखराब 20 आर शिवार मौजे बेलवाडी ज्याची चतु:सिमा

पुर्वेस :– गुंडाजी हरी मिरगेवाड

पान..2..वर

पश्चिमेस :– भास्कर गोवर्धन घोगरे
दक्षिणेस :– रंगनाथ फुटके यांची शेती व
उत्तरेस :– तुकाराम रोहिदास मिरगेवाड
शिवार मौजे बेलवाडी ता.गंगाखेड

ब) शेती गट नंबर 31 नामे रूस्तुम नारायण क्षेत्रफळ 40 आर पोटखराबासह ज्याची चतुःसिमा
पुर्वेस :– भानुदास व नामदेव पि.संभाजी मिरगेवाड
पश्चिमेस :– नाला
दक्षिणेस :– रावसाहेब निवृत्ती मिरगेवाड
उत्तरेस :– बालासाहेब साहेबराव मिरगेवाड
शिवार मौजे बेलवाडी ता.गंगाखेड तसेच शेती गट नंबर 31 नामे रूस्तुम नारायण क्षेत्रफळ 40 आर शिवार मौजे बेलवाडी ज्याच्या चतुःसिमा एकच आहेत.

2) वरील वादग्रस्त शेतावर पोडगीचा बोजा ठेवणे बाबत.

3) शाश्वत निषेध मनाई आज्ञा प्रतिवादी नं. 3 च्या विरूध्द अश्या प्रकारे देवविण्यात यावे की, प्रतिवादीने वादात्मक शेती इतर कोणासही बय, गहाण, बक्षिस अथवा अन्य प्रकारे हस्तांतरीत करू नये

वादी आपले वादपत्र खालील प्रमाणे सादर करीत आहे.

1) असे की, वादी हि प्रतिवादी नं. 2 ची हिंदु धर्म शास्त्राप्रमाणे कायदेशीर पत्नी असुन प्रतिवादी नंबर 3 हा वादीचा सासरा आहे.

वादीचा प्रतिवादी नंबर 2 सोबत विवाह दि.1998 ला झाला वादीला निकिता पि. विठ्ठल मिरगेवाड हि मुलगी झालेली असुन तिचा विवाह झालेला आहे. त्याच प्रमाणे आकाश पिता विठ्ठल मिरगेवाड हा मुलगा असुन तो सज्ञान आहे. व नेहा विठ्ठल मुलगी सज्ञान आहे. वादीने प्रतिवादी नंबर 2 व 3 सोबत 2012 पर्यंत संसार केला परंतु वादीवर चारीत्र्या बाबत प्रतिवादी नंबर 2 व 3 ने संशय घेतला व तिला घराच्या बाहेर हाकालुन दिले. व वादी हि आपल्या माहेरी मौजे घटांग्रा येथे राहत आहे.

2) असे की, वादीला प्रतिवादीने त्रास दिल्यामुळे वादीने प्रतिवादीच्या विरूध्द दि. 16/09/2012 ला 498 तहत कारवाई केली ज्याचा आर.सी.सी. नंबर 231/2012 हा होता त्याची प्रत सोबत देण्यात येते. त्याचप्रमाणे प्रतिवादी नंबर 2 च्या विरूध्द वादीने पालम येथील न्यायालयात किरकोळ अर्ज कमांक 19/2012 तहत पोडगी बाबत अर्ज दिला त्याचा निर्णय दिनांक 05/02/2015 ला झाला वादी यांना प्रतिमहिना 700/— रू. आदेश केलेला आहे. सबंधीत वसुलीच्या कारवाईमध्ये वारंवार वारंट काढले परंतु कोणत्याही प्रकारची पोडगी भरलेली नाही. अश्या प्रकारे वादीला प्रतिवादीने जाच जुलुम केलेला आहे.

3) असे की, प्रतिवादी नंबर 3 हे वादीचे सासरे आहेत. त्यांच्या नावे शेती आहे. सदर शेती वडिलोपार्जीत व एकत्र कुटूंबातील मिळकतीची आहे. आद्याप प्रतिवादीमध्ये वाटण्या झालेल्या नाहीत. प्रतिवादी नंबर 3 ने वादीला हिस्सा मिळुनये म्हणुन इतरांच्या नावे नॉमिनल शेती केलेली आहे. वादीने प्रतिवादी नंबर 2 व 3 च्या विरूध्द सरस निरस वाटणी करून ताबा देवविण्या बाबत वादपत्र

दिवाणी दावा नंबर 332/2022 दाखल केलेले आहे. जे चालु आहे. त्यामध्ये प्रतिवादी नंबर 1 ची मुलगी नंदाबाई भरत चंदेवाड हि पुणे येथे राहते परंतु समस घेण्यास टाळाटाळ करीत आहे.

4) अ से की, वादात्मक शेती हेतु पुर्वक प्रतिवादी नंबर 3 प्रतिवादी नंबर 2 च्या हक्कात करून देत नाही. वादी नंबर 2 यांनी मौजे लव्हराळ ता.लोहा येथील दुसरी पत्नी मैना केलेली आहे. व तिच्या पासुन 2 आपत्य झालेली आहेत. त्यामुळे वादी सोबत प्रतिवादी नंबर 1 हा संसार करीत नाही.

5) असे की, वादात्मक शेती गट नंबर 41 क्षेत्रफळ 56 आर शिवार मौजे बेलवाडी व गट नंबर 31 क्षेत्रफळ 80 आर शिवार मौजे बेलवाडी सदर शेती हि भारीची असुन वर्षाकाठी प्रतिवादी नंबर 2 व 3 यांना खर्च वजा जाता 10,00,000/- रू. उत्पन्न होते. सदर शेतामध्ये कापुस, केळी इत्यादी पिकाचे उत्पन्न होते सदर शेती सुपीक आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी नं. 2 हा साखर कारखाना सोलापुर येथे मजुर पुरविण्याचे काम करतो व तो मुकदम आहे. त्याला वर्षाकाठी 50,000/- रूपयाचे उत्पन्न होते. तसेच प्रतिवादी नंबर 2 व 3 यांना मौजे घटांग्रा येथे किराणा दुकान आहे व त्यापासुन वर्षाकाठी त्यांना 1,00,000/- रूपयाचे उत्पन्न होते अशा प्रकारे प्रतिवादी 2 व 3 हे सधन आहेत. पोडगी देण्यास समर्थ आहेत वादात्मक शेतीवर पोडगीचा बोजा ठेवण्यात यावा. त्याच प्रमाणे वादात्मक शेती प्रतिवादी नंबर 2 व 3 यांनी इतर कोणासही हस्तांतरीत करूनये म्हणुन शाश्वत कायम निषेध आदेश देवविण्यात यावे.

6) असे की, प्रतिवादी नंबर 1 हे शासकीय कर्मचारी आहेत परंतु ते संगणमत करून वादात्मक शेती विकी करण्याच्या प्रयत्नात

आहेत. त्यामुळे वादीचे नुकसान होणार आहे. सदर विक्री हि दोन तिन दिवसात करणार आहेत म्हणुन प्रतिवादी नंबर 1 ला दोन महिन्याच्या आत नोटीस देण्यास अडचण आहे. त्याचा गैरफायदा प्रतिवादी घेणार आहेत. म्हणुन सि.पि.सि.चे कलम 80 (2) तहत मा. न्यायालयात अर्ज दिलेला आहे. म्हणुन बिना नोटीस वादपत्र स्विकारण्यात यावे नंतर नोटीस देण्यात येईल.

7) असे की, वादीने पतिवादीला दिनांक 01 एप्रिल 2026 ला वादात्मक शेतीमधील उत्पन्नातुन पोडगी देवविण्याची मागणी केली या उलट प्रतिवादी यांनी वादात्मक शेती विक्री करण्याची धमकी दिली वरील तारीख व कारण गृहित धरून वादपत्र दिले आहे.

8) असे की,वादी व प्रतिवादी यांचे राहण्याचे ठिकाण त्याच प्रमाणे वादात्मक शेती तसेच वादीला प्रतिवादीने दिलेला नकार या संपुर्ण बाबी मा.न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात आहेत म्हणुन वादपत्र सादर केले आहे.

9) असे की, मुंबई व्हॅलीवेशन ॲक्ट प्रमाणे वादी यांना प्रति महा 50,000/– रू. पोडगी देवविण्याची मागणी केली आहे. 12 महिन्याची पोडगी 6,00,000/–रू. होते त्याच प्रमाणे बोजा ठेवण्याच्या मागणीसाठी 1000/–रू. व शाश्वत निषेध मनाई आज्ञानासाठी 1000/–रू. असे एकुण वादपत्राचे मुल्य 6,02,000/– रू. मुल्यांकन ठरविल्या जाते जे योग्य आहे.

10) असे की, मुंबई कोर्ट भिस ॲक्ट प्रमाणे वादपत्राचे मुल्य 6,02,000/– रू. आहे. त्यावर कोर्ट फिस ~~16,430/–~~ इतके रूपये होते. सदर वादपत्र हे वैवाहिक सबंधातील असल्यामुळे कोर्ट फिस देण्याची आवश्यकता नाही. विना कोर्ट फिस वादपत्र सादर

केले जाते.

वादीचे वादपत्र खर्चासह डिक्री करण्यात यावे.

दिनांक 15/4/26

विनंती की,

वाद :– 1) वादीस प्रतिवादी कडून मासीक पोडगी रूपये वादी नंबर 1 ला प्रतिमहा 50,000/– रू. देवविण्यात यावे.

अ) वादात्मक शेती गट नंबर 41 नामे रूस्तुम नारायण मिरगेवाड क्षेत्रफळ 36 पोटखराब 20 आर शिवार मौजे बेलवाडी ज्याची चतुःसिमा पुर्वेस :– गुंडाजी हरी मिरगेवाड, पश्चिमेस :– भास्कर गोवर्धन घोगरे दक्षिणेस :– रंगनाथ फुटके यांची शेती व उत्तरेस :– तुकाराम रोहिदास मिरगेवाड शिवार मौजे बेलवाडी ता.गंगाखेड

ब) शेती गट नंबर 31 नामे रूस्तुम नारायण क्षेत्रफळ 40 आर पोटखराबासह ज्याची चतुःसिमा पुर्वेस :– भानुदास व नामदेव पि. संभाजी मिरगेवाड, पश्चिमेस :– नाला, दक्षिणेस :– रावसाहेब निवृत्ती मिरगेवाड, उत्तरेस :– बालासाहेब साहेबराव मिरगेवाड शिवार मौजे बेलवाडी ता.गंगाखेड तसेच शेती गट नंबर 31 नामे रूस्तुम नारायण क्षेत्रफळ 40 आर शिवार मौजे बेलवाडी ज्याच्या चतुःसिमा एकच आहेत.

सौ सक्षीता मिरगेवाड

2) वरील वादग्रस्त शेतावर पोडगीचा बोजा ठेवणे बाबत.

3) शाश्वत निषेध मनाई आज्ञा प्रतिवादी नं. 2 च्या विरूध्द अश्या प्रकारे देवविण्यात यावे की, प्रतिवादीने वादात्मक शेती इतर कोणासही बय, गहाण, बक्षिस अथवा अन्य प्रकारे हस्तांतरीत क रू नये.

वादीचे वादपत्र खर्चासह डिक्री करण्यात यावे.

दिनांक 15/ 4/26

वादी

सौ रुक्मीन मिरगेवाड

रूक्मीनबाई भ्र. विठ्ठल मिरगेवाड

रा.घटांग्रा हा.मु. तांदुळवाडी ता.पालम जि.परभणी.

**सत्यापन**

आम्ही वादी शपथपुर्वक निवेदन करते की, वादपत्रातील मजकुर हा खरा असुन मला मान्य आहे.

दिनांक 15/ 4 /26

वादी

तर्फे

ॲड.सी.बी.मंदोडे

गंगाखेड

सौ रुक्मीन मिरगेवाड

रूक्मीनबाई भ्र. विठ्ठल मिरगेवाड

रा.घटांग्रा हा.मु. तांदुळवाडी ता.पालम जि.परभणी.

Exh.06

# मा.दिवाणी न्यायाधिश साहेब, वरिष्ठ स्तर ता.गंगाखेड

दिवाणी दावा नंबर /2026

ORDER
Seen & filed.
Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2026.04.28 17:44:04 +0530
CJSD, Gangakhed.

वादी :– रूक्मीनबाई

विरूध्द

प्रतिवादी :– मा.दुयम निबंधक साहेब,
दुयम निबंधक कार्यालय,
गंगाखेड

वाद :– पोडगी

## शपथपत्र वादपत्रासाठी

मी रूक्मीन पिता भ्र.विठ्ठल मिरगेवाड 36 वर्षे, धंदा घरकाम रा.घटांग्रा हा.मु. तांदुळवाडी ता.पालम जि.परभणी.शपथपुर्वक निवेदन करते की, प्रतिवादी नंबर 2 हा माझा पती असुन प्रतिवादी नंबर 3 हे माझे सासरे आहेत वादात्मक शेती गट नंबर 41 क्षेत्रफळ 50 आर व गट नंबर 31 क्षेत्रफळ 40 आर शिवार मौजे बेलवाडी हि माझी वडिलोपार्जीत व एकत्र कुटूंबातील शेती असुन सदर शेती हि भारी आहे व सुपिक आहे मला प्रतिवादी यांनी 2015 ला घराच्या बाहेर हाकालुन दिले आहे. मला चार आपत्य आहेत. प्रतिवादी नंबर 2 व 3 सांभाळ करीत नाहीत. मी प्रतिवादी नंबर 2 व 3 विरूध्द आर.सी.सी. नंबर 231/2012, 498 तहत कारवाई केलेली आहे. तसेच पोडगीचा दावा पालम येथील न्यायालयात दाखल केलेला होता तो मंजुर झालेला आहे. प्रतिवादी नंबर 2 हा पोडगी भरत नाही. प्रतिवादी नंबर 3 च्या नावे शेती असल्यामुळे त्याचा गैरफायदा तो घेत आहे. म्हणुन वादीस प्रतिमहा 50,000/– रू. पोडगी देवविण्यात यावी. वादपत्र डिकी करावे. वादपत्रातील मजकुर मी वाचुन बधितला तो खरा आहे.

श्री रुक्मीन मिरगेवाड

पान..2..वर

दिनांक 08 / 04 / 2026

निवेदिका

सौ रुक्मीन मिरगेवाड

रूक्मीनबाई भ्र. विठ्ठल मिरगेवाड

रा.घटांग्रा हा.मु. तांदुळवाडी ता.पालम जि.परभणी.

**सत्यापन**

आम्ही वादी शपथपुर्वक निवेदन करते की, शपथपत्रातील मजकुर हा खरा असुन मला मान्य आहे.

08 / 04 / 2026

निवेदिका

सौ रुक्मीन मिरगेवाड

रूक्मीनबाई भ्र. विठ्ठल मिरगेवाड

रा.घटांग्रा हा.मु.तांदुळवाडी ता.पालम जि.परभणी.

AFFIDAVIT

Solemnly affirmed before me
by Rukmin Vithal Mirgewad.
Age 36 years Occu: H.H. R/o Tandulwadi
Who is identified before me
by Adv. G.B. Mandode Tq Palam.

to whom I know Personally

8/4/2026

Nikam
Ganesh Bhaurao Nandakhed

सौ रुक्मीन मिरगेवाड

Exh.02

Exh. No.

# VAKALATNAMA

IN THE COURT OF HON'BLE **S.D.** AT **Gangaked**

RCS No. /2026




Complainant/Petitioner Appellant/Plaintiff :- Rukminbai W/o Vittal Mirgewad

VERSUS

Accused/Opponent :- Sub. Registar

Claim/Charge :- Mantinance

Rukminbai W/o Vittal Mirgewad Age : 36 Year, Occ. Hous , R/o. Tandulwadi Tq. Palam Dist. Parbhani

Above named hereby appointed and authorised to
**ADV. C. B. MANDODE**
B.A..LL.B.
Reg.No.MAH/1659/1981, (E-mail ID-mandodechandrakant@gmail.com)
Office -Thakur Colony.Gangakhed

To appear, act and plead on my/our behalf in the above matter to conduct cases & to authorise another advocate to do the aforsaid acts on my/our behalf occasionally and in case of urgency and necessary In witness where I/we have signed below this 15th day of Ap. 2026

ORDER
Seen & filed.

Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2026.04.28 17:44:11 +0530

CJSD, Gangakhed.

Signature of client

Singnature of Advocate's

**ADV.C. B. MANDODE**
Cell No. 8999 2056 46 / 98504427 60
Accepted and filed on 15/ 4 /2026

Exh.03

ORDER
Seen & filed.

Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2026.04.28 17:44:19 +0530

CJSD, Gangakhed.

मा.दिवाणी न्यायाधिश साहेब, वरिष्ठ स्तर ता.गंगाखेड

स्पेशल दि.दा.नंबर /2024

धनको :– रूक्मीनबाई

विरूध्द

ऋणको :– मा.दुयम निबंधक साहेब,
दुयम निबंधक कार्यालय,
गंगाखेड

वाद :– डिक्री

वादीचा पत्ता

रूक्मीनबाई भ्र.विठ्ठल मिरगेवाड
रा.घटांग्रा हा.मु. तांदुळवाडी

सौ रूक्मीन मिरगेवाड

आम्ही आपिलार्थी शपथेवर निवेदन करतोत की, वरील प्रमाणेचा आमचा पत्ता खरा व बरोबर आहे करीता तसदीक करण्यात आली.

दिनांक 15/ 4 /2026

सौ रूक्मीन मिरगेवाड

तर्फे
अ‍ॅड. सी.बी.मंदोडे
गंगाखेड.

4

Exh.04

## मा.दिवाणी न्यायाधिश साहेब, वरिष्ठ स्तर ता.गंगाखेड

स्पेशल दि.दा.नंबर /2024

धनको :– रूक्मीनबाई

विरूध्द

ऋणको :– मा.दुयम निबंधक साहेब,
दुयम निबंधक कार्यालय,
गंगाखेड

ORDER
Seen & filed.

Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2026.04.28 17:44:27 +0530

CJSD, Gangakhed.

वाद :– पोडगी

### कागदोपत्राची यादी

| अ.क. | कादपत्राचा तपशील | शेरा |
|---|---|---|
| 1 | 7/12 गट नंबर 41 शिवार मौजे बेलवाडी दिनांक 28/03/2026 | डिजीटल |
| 2 | 7/12 गट नंबर 31 शिवार मौजे बेलवाडी दि.28/03/2026 | डिजीटल |
| 3 | आर.सी.सी. नंबर 231/2012 निशानी कमांक 1 ची नक्कल दिनांक 19/07/2024 | सत्यप्रत. |
| 4 | किरकोळ अर्ज कमांक 19/2012 नेहा विरूध्द विठ्ठल फैसला नक्कल दिनांक 05/02/2015 | झेरॉक्स |
| 5 | आधार कार्ड | सत्यप्रत |

दिनांक 18/4 /2026

तर्फे
अ‍ॅड. सी.बी.मंदोडे
गंगाखेड

वादी
रूक्मीनबाई विठ्ठल मिरगेवाड
रा.तांदुळवाडी ता.पालम जि.परभणी.




## मा.दिवाणी न्यायाधिश साहेब, वरिष्ठ स्तर ता.गंगाखेड

दिवाणी दावा नंबर /2026

Exh.05

वादीः— 1) रूक्मीनबाई भ्र. विठ्ठल मिरगेवाड
वय 36 वर्षे, धंदा घरकाम
रा.घटांग्रा हा.मु. तांदुळवाडी ता.पालम जि.परभणी.
मो.नं. 7558781939

विरूध्द

प्रतिवादीः — 1) मा.दुयम निबंधक साहेब, दुयम निबंधक कार्यालय, गंगाखेड

2) विठ्ठल पिता रूस्तुम मिरगेवाड
वय 45 वर्षे,धंदा शेती व गुत्तेदारी
रा.घटांग्रा ता.गंगाखेड जि.परभणी.

3) रूस्तुम पिता नारायण मिरगेवाड
वय 62 वर्षे, धंदा शेती
रा.वाल्मीक नगर घटांग्रा ता.गंगाखेड जि.परभणी.

सौ रुक्मीन मिरगेवाड

वाद :— पोडगी

**वरील प्रकरणी वादी तर्फे ऑर्डर 39 रूल 1 व 2 तर्फे खालील प्रमाणे अर्ज सादर करण्यात येत आहे.**

1) असे की, वादीने पोडगी बाबत वादपत्र दाखल केले आहे जे चालु आहे.

2) असे की, वादीला प्रतिवादीने त्रास दिल्यामुळे वादीने प्रतिवादीच्या विरूध्द दि. 16/09/2012 ला 498 तहत कारवाई केली ज्याचा आर.सी.सी. नंबर 231/2012 हा होता त्याची प्रत

पान...2..वर

सोबत देण्यात येते. त्याचप्रमाणे प्रतिवादी नंबर 2 च्या विरूध्द वादीने पालम येथील न्यायालयात किरकोळ अर्ज कमांक 19/2012 तहत पोडगी बाबत अर्ज दिला त्याचा निर्णय दिनांक 05/02/2015 ला झाला वादी यांना प्रतिमहिना 700/- रू. आदेश केलेला आहे. सबंधीत वसुलीच्या कारवाईमध्ये वारंवार वारंट काढले परंतु कोणत्याही प्रकारची पोडगी भरलेली नाही. अश्या प्रकारे वादीला प्रतिवादीने जाच जुलुम केलेला आहे.

3) असे की, प्रतिवादी नंबर 3 हे वादीचे सासरे आहेत. त्यांच्या नावे शेती आहे. सदर शेती वडिलोपार्जीत व एकत्र कुटूंबातील मिळकतीची आहे. आद्याप प्रतिवादीमध्ये वाटण्या झालेल्या नाहीत. प्रतिवादी नंबर 3 ने वादीला हिस्सा मिळुनये म्हणुन इतरांच्या नावे नॉमिनल शेती केलेली आहे. वादीने प्रतिवादी नंबर 2 व 3 च्या विरूध्द सरस निरस वाटणी करून ताबा देवविण्या बाबत वादपत्र दिवाणी दावा नंबर 332/2022 दाखल केलेले आहे. जे चालु आहे. त्यामध्ये प्रतिवादी नंबर 1 ची मुलगी नंदाबाई भरत चंदेवाड हि पुणे येथे राहते परंतु समस घेण्यास टाळाटाळ करीत आहे.

4) अ से की, वादात्मक शेती हेतु पुर्वक प्रतिवादी नंबर 3 प्रतिवादी नंबर 2 च्या हक्कात करून देत नाही. वादी नंबर 2 यांनी मौजे लव्हराळ ता.लोहा येथील दुसरी पत्नी मैना केलेली आहे. व तिच्या पासुन 2 आपत्य झालेली आहेत. त्यामुळे वादी सोबत प्रतिवादी नंबर 1 हा संसार करीत नाही.

5) असे की, वादात्मक शेती गट नंबर 41 क्षेत्रफळ 56 आर शिवार मौजे बेलवाडी व गट नंबर 31 क्षेत्रफळ 80 आर शिवार मौजे बेलवाडी सदर शेती हि भारीची असुन वर्षाकाठी प्रतिवादी नंबर 2 व 3 यांना खर्च वजा जाता 10,00,000/- रू. उत्पन्न होते. सदर

शेतामध्ये कापुस, केळी इत्यादी पिकाचे उत्पन्न होते सदर शेती सुपीक आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी नं. 2 हा साखर कारखाना सोलापुर येथे मजुर पुरविण्याचे काम करतो व तो मुकदम आहे. त्याला वर्षाकाठी 50,000/– रूपयाचे उत्पन्न होते. तसेच प्रतिवादी नंबर 2 व 3 यांना मौजे घटांग्रा येथे किराणा दुकान आहे व त्यापासुन वर्षाकाठी त्यांना 1,00,000/– रूपयाचे उत्पन्न होते अशा प्रकारे प्रतिवादी 2 व 3 हे सधन आहेत. पोडगी देण्यास समर्थ आहेत वादात्मक शेतीवर पोडगीचा बोजा ठेवण्यात यावा. त्याच प्रमाणे वादात्मक शेती प्रतिवादी नंबर 2 व 3 यांनी इतर कोणासही हस्तांतरीत करूनये म्हणुन शाश्वत कायम निषेध आदेश देवविण्यात यावे.

6) असे की, प्रतिवादी नंबर 1 हे शासकीय कर्मचारी आहेत परंतु ते संगणमत करून वादात्मक शेती विकी करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यामुळे वादीचे नुकसान होणार आहे. सदर विकी हि दोन तिन दिवसात करणार आहेत म्हणुन प्रतिवादी नंबर 1 ला दोन महिन्याच्या आत नोटीस देण्यास अडचण आहे. त्याचा गैरफायदा प्रतिवादी घेणार आहेत. म्हणुन सि.पि.सि.चे कलम 80 (2) तहत मा.न्यायालयात अर्ज दिलेला आहे. म्हणुन बिना नोटीस वादपत्र स्विकारण्यात यावे नंतर नोटीस देण्यात येईल.

7) असे की, वादात्मक शेती हि प्रतिवादी नंबर 3 च्या नावाने आहे. सदर शेती वडिलोपार्जीत एकत्र कुटूंबातील मिळकतीची आहे. प्रतिवादी नंबर 2 हा वादी सोबत 2015 पासुन संसार करीत नाही. वादात्मक शेती हे दोघांच्या वादामुळे प्रतिवादी नंबर 3 विकी करण्याच्या प्रयत्नात आहे. त्यामुळे वादीचे नुकसान होणार आहे. म्हणुन प्रतिवादी नंबर 3 च्या विरूध्द तात्पुरता मनाई आदेश अशा प्रकारे देवविण्यात यावा की, प्रतिवादी नंबर 1 व 3 यांनी वादात्मक शेती वाद कलममध्ये दर्शविलेली

वादपत्राचा निकाल लागेपावेतो इतर कोणासही बय, गहाण, बक्षिस अथवा अन्य प्रकारे हस्तांतरीत किंवा विक्री करूनये वादीने केस सिध्द केलेली आहे. बॅलेन्स वादीच्या हक्कात आहे सदर शेती विक्री झाली तर वादीचे न भरून येणारे नुकसान होणार आहे. म्हणुन तत्पुरता हुकुम प्रतिवादी नंबर 1 व 3 च्या विरूध्द देवविण्यात यावा.

दिनांक 15/5/26

विनंती की,

सदरील अर्ज मान्य करण्यात येवुन प्रतिवादी नंबर 1 व 3 च्या विरूध्द तात्पुरता मनाई आदेश अशा प्रकारे देवविण्यात यावा की, प्रतिवादीने वादकलम मधील शेती इतर कोणासही बय,गहाण, बक्षिस अथवा अन्य पकारे हस्तांतरीत करूनये.

दिनांक 15/5/26

वादी

सौ रुक्मीन मिरगेवाड

रूक्मीनबाई भ्र. विठ्ठल मिरगेवाड

रा.घटांग्रा हा.मु. तांदुळवाडी ता.पालम जि.परभणी.

सत्यापन

आम्ही वादी शपथपुर्वक निवेदन करते की, अर्जातील मजकुर हा खरा असुन मला मान्य आहे.

दिनांक 15/5/26

वादी

तर्फे

अॅड.सी.बी.मंदोडे

गंगाखेड

सौ रुक्मीन मिरगेवाड

रूक्मीनबाई भ्र. विठ्ठल मिरगेवाड

रा.घटांग्रा हा.मु. तांदुळवाडी ता.पालम जि.परभणी.

मा.दिवाणी न्यायाधिश साहेब, वरिष्ठ स्तर ता.गंगाखेड

दिवाणी दावा नंबर /2026

Exh.07

वादी :– रूक्मीनबाई

विरूध्द

प्रतिवादी :– मा.दुयम निबंधक साहेब,
दुयम निबंधक कार्यालय,
गंगाखेड

ORDER
Seen & filed.

Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2026.04.28 17:44:41 +0530

CJSD, Gangakhed.

वाद :– पोडगी

## शपथपत्र मनाई हुकुमासाठी

मी रूक्मीन पिता भ्र.विठ्ठल मिरगेवाड 36 वर्षे, धंदा घरकाम रा.घटांग्रा हा.मु. तांदुळवाडी ता.पालम जि.परभणी.शपथपुर्वक निवेदन करते की, प्रतिवादी नंबर 2 हा माझा पती असुन प्रतिवादी नंबर 3 हे माझे सासरे आहेत वादात्मक शेती गट नंबर 41 क्षेत्रफळ 50 आर व गट नंबर 31 क्षेत्रफळ 40 आर शिवार मौजे बेलवाडी हि माझी वडिलोपार्जीत व एकत्र कुटूंबातील शेती असुन सदर शेती हि भारी आहे व सुपिक आहे मला प्रतिवादी यांनी 2015 ला घराच्या बाहेर हाकालुन दिले आहे. मला चार आपत्य आहेत. प्रतिवादी नंबर 2 व 3 सांभाळ करीत नाहीत. मी प्रतिवादी नंबर 2 व 3 विरूध्द आर.सी.सी. नंबर 231/2012, 498 तहत कारवाई केलेली आहे. तसेच पोडगीचा दावा पालम येथील न्यायालयात दाखल केलेला होता तो मंजुर झालेला आहे. प्रतिवादी नंबर 2 हा पोडगी भरत नाही. प्रतिवादी नंबर 3 च्या नावे शेती असल्यामुळे त्याचा गैरफायदा तो घेत आहे. म्हणुन वादीस प्रतिमहा 50,000/– रू. पोडगी देवविण्यात यावी. वादपत्र डिक्री करावे. प्रतिवादी नंबर 2 यांच्या नावे शेती असल्यामुळे तो एक

पान..2..वर

दोन दिवसामध्ये विकी करण्याच्या प्रयत्नात आहे. त्यामुळे वादीचे नुकसान होणार आहे बॅलेन्स वादीच्या हक्कात आहे. वादीने केस सिध्द केलेली आहे. म्हणुन निशानी कमांक 5 चा अर्ज मंजुर करण्यात यावा.

दिनांक 08 / 04 / 2026

निवेदिका

सौ रुक्मीन मिरगेवाड

रूक्मीनबाई भ्र. विठ्ठल मिरगेवाड

रा.घटांग्रा हा.मु. तांदुळवाडी ता.पालम जि.परभणी.

सत्यापन

आम्ही वादी शपथपुर्वक निवेदन करते की, शपथपत्रातील मजकुर हा खरा असुन मला मान्य आहे.

08 / 04 / 2026

निवेदिका

सौ रुक्मीन मिरगेवाड

रूक्मीनबाई भ्र. विठ्ठल मिरगेवाड

रा.घटांग्रा हा.मु.तांदुळवाडी ता.पालम जि.परभणी.

AFFIDAVIT

Solemnly affirmed before me

by Rukmin Vitthal Mirgewad,

Age 36 yrs occu HH R/o Tandalwadi

Who is identified before me

by Adv. G.B. Mandode TQ Palam

is shown / known personally

8/4/2026

सौ रुक्मीन मिरगेवाड